**L. A. BILL No. XCII OF 2025.**

A BILL

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA PUBLIC TRUSTS ACT.

**सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९२.**

**महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियमात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.**
**(विधानसभेने दिनांक ९ डिसेंबर, २०२५ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

१९५० चा २९. **ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ;

**आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियमात आणखी सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे, अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती; आणि, म्हणून, त्यांनी दिनांक १ सप्टेंबर २०२५ रोजी, महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था (सुधारणा) अध्यादेश, २०२५, हा प्रख्यापित केला होता ; २०२५ चा महा. अध्या. ७.

**आणि ज्याअथी**, उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रुपांतर करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या शहात्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :-

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था (दुसरी सुधारणा) अधिनियम, २०२५, असे म्हणावे.

(२) (अ) कलम ५ खेरीज, तो, तात्काळ अंमलात येईल.

(ब) कलम ५ हे, राज्य शासन, **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारे नियत करील अशा दिनांकास अंमलात येईल.

सन १९५० चा अधिनियम क्रमांक २९ याच्या कलम २ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम (यात यापुढे ज्याचा निर्देश, "मुख्य अधिनियम" असा केला आहे) याच्या कलम २ मध्ये,- १९५० चा २९.

(१) खंड (९) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :-

"(९अ) "अखंड विश्वस्त" म्हणजे, विश्वस्तव्यवस्था लेखानुसार किंवा या अधिनियमाच्या तरतुदींनुसार आजीवनासाठी किंवा कायम विश्वस्त म्हणून नियुक्त केलेला विश्वस्त;";

(२) खंड (१७) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :-

"(१७अ) "सावधि विश्वस्त" म्हणजे, विश्वस्तव्यवस्था लेखानुसार किंवा या अधिनियमाच्या तरतुदींनुसार विशिष्ट कालमर्यादेसाठी नियुक्त केलेला विश्वस्त;";

(३) खंड (१८) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येईल :-

"(१८) "विश्वस्त" म्हणजे, जिच्यामध्ये एकतर, एकट्याने किंवा इतर व्यक्तींसोबत विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता निहित केलेली आहे अशी व्यक्ती आणि त्यात, सावधि विश्वस्ताचा व अखंड विश्वस्ताचा समावेश होतो;".

सन १९५० चा अधिनियम क्रमांक २९ याच्या कलम १८ ची सुधारणा.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम १८ मध्ये, पोट-कलम (६) मधील, "अस्तित्वांत असेल तर एक प्रत" या मजकुरानंतर, "आणि विश्वस्तव्यवस्थेच्या स्थावर मालमत्तेवर मालकी किंवा हितसंबंध दर्शविणाऱ्या दस्तऐवजाची प्रत" हा मजकूर जादा दाखल करण्यात येईल.

सन १९५० चा अधिनियम क्रमांक २९ मध्ये नवीन कलम ३०अ समाविष्ट करणे.

**४.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३० नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :-

सावधि विश्वस्ताची किंवा अखंड विश्वस्ताची नियुक्ती.

**"३०अ.** (१) जेव्हा सावधि विश्वस्ताच्या नियुक्तीचा विशिष्ट कालावधी समाप्त होतो तेव्हा, एकतर, विश्वस्तव्यवस्था लेखामध्ये किंवा विश्वस्तांनी घेतलेल्या कोणत्याही निर्णयामध्ये एतद्‌विरुद्ध काहीही अंतर्भूत असले तरी, असा सावधि विश्वस्त, त्याची पुनर्नियुक्ती झाल्याखेरीज व होत नाही तोपर्यंत, विश्वस्त म्हणून कार्ये करण्याचे आणि कर्तव्ये पार पाडण्याचे बंद करील :

परंतु, जर, विश्वस्ताची नियुक्ती किंवा पुनर्नियुक्ती करण्यासाठी कोणत्याही विनिर्दिष्ट कालावधीबाबत विश्वस्तव्यवस्था लेखामध्ये काहीही नमूद केलेले नसेल किंवा स्पष्टपणे तरतूद केलेली नसेल तर, विश्वस्तव्यवस्था लेखामध्ये किंवा विश्वस्तांकडून घेतलेला असू शकेल अशा कोणत्याही निर्णयामध्ये एतद्‌विरुद्ध काहीही अंतर्भूत असले तरी, एका वेळेस पाच वर्षांपर्यंतच्या कालावधीसाठी विश्वस्ताची एकमताने नियुक्ती करणे विद्यमान किंवा उत्तरजीवी विश्वस्तांसाठी कायदेशीर असेल.

(२) जर अखंड विश्वस्त म्हणून विश्वस्ताची नियुक्ती करण्यासाठी विश्वस्तव्यवस्था लेखामध्ये कोणतीही विशिष्ट तरतूद अंतर्भूत नसेल तर, विश्वस्तव्यवस्थेच्या परिपाठामध्ये किंवा विश्वस्तांकडून घेतलेला असू शकेल अशा कोणत्याही निर्णयामध्ये एतद्‌विरुद्ध काहीही अंतर्भूत असले तरी, विश्वस्तव्यवस्थेतील कोणत्याही वेळी असलेली अखंड विश्वस्तांची संख्या, विश्वस्तांच्या एकूण संख्येच्या एक चतुर्थांशपेक्षा अधिक असणार नाही :

परंतु, विद्यमान किंवा उत्तरजीवी विश्वस्तांना, ज्याचा कालावधी समाप्त झाला आहे त्या सावधि विश्वस्ताची, पुढीलपैकी कोणतेही कारण उद्‌भवल्यामुळे रिक्त झालेल्या अखंड विश्वस्ताच्या रिक्त जागेवरच केवळ, अखंड विश्वस्त म्हणून एकमताने नियुक्ती करता येईल :-

(अ) मृत्यू ;

(ब) नादारी ;

(क) अत्यंतिक वार्धक्य, आजारपण, – मग ते शारीरिक किंवा मानसिक असो,- या कारणामुळे त्याच्या पदाची कार्ये व कर्तव्ये पार पाडण्यास अक्षम किंवा अपात्र ठरणे ;

(ड) कायमस्वरूपी परदेशात राहण्याच्या उद्देशाने भारत सोडून जाणे ;

(इ) नैतिक अधःपतनाचा अंतर्भाव असणाऱ्या कोणत्याही अपराधाबद्दल दोषसिद्ध ठरणे.

(३) विश्वस्तव्यवस्था लेखामध्ये, किंवा विश्वस्तांकडून घेतलेला असू शकेल अशा कोणत्याही निर्णयामध्ये एतद्‌विरूध्द काहीही अंतर्भूत असले तरी, सावधि विश्वस्तांची किंवा अखंड विश्वस्तांची, विश्वस्तव्यवस्था लेखामध्ये स्पष्टपणे किंवा अनिवार्य गर्भितार्थाने निर्धारित केलेल्या विश्वस्तांच्या कमाल संख्येच्या मर्यादेतच नेहमी नियुक्ती करण्यात येईल. त्यानुसार, विद्यमान किंवा उत्तरजीवी विश्वस्तांची, एकतर, सावधि विश्वस्ताचा कालावधी संपल्यावर किंवा पोट-कलम (२) च्या खंड (अ) ते (इ) मध्ये विनिर्दिष्ट केलेली कोणतीही घटना घडल्यावर, विश्वस्तव्यवस्था लेखामध्ये अशाप्रकारे निर्धारित केलेल्या विश्वस्तांच्या कमाल संख्येपेक्षा अधिक संख्येत, कोणत्याही विश्वस्ताची किंवा विश्वस्तांची नियुक्ती करता येणार नाही.".

**५.** मुख्य अधिनियमाच्या कलम ५०अ नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :-

सन १९५० चा अधिनियम क्रमांक २९ यामध्ये नवीन कलम ५०ब समाविष्ट करणे.

"**५०ब.** (अ) कोणत्याही विश्वस्त व्यवस्थेसाठी योजना तयार करण्याची किंवा त्यात फेरबदल करण्याची; किंवा

दिवाणी न्यायालय, इत्यादींच्या जागी धर्मादाय आयुक्ताचा संदर्भ घेणे.

(ब) कोणत्याही विश्वस्तव्यवस्थेचा अध्यक्ष किंवा सभापती किंवा विश्वस्त किंवा पदाधिकारी म्हणून काम करण्याची किंवा त्यांची कार्ये पार पाडण्याची; किंवा

(क) कोणत्याही विश्वस्तव्यवस्थेच्या कोणत्याही विश्वस्ताची किंवा विश्वस्तांची नियुक्ती करण्याची,

अधिकारिता, अधिकार किंवा प्राधिकार असणाऱ्या कोणत्याही सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेच्या कोणत्याही विश्वस्तव्यवस्था लेखातील, योजनेतील, दिलेल्या किंवा पारित केलेल्या कोणत्याही न्यायालयाच्या आदेशातील किंवा हुकुमनाम्यातील,- मग तो हा अधिनियम लागू होण्याच्या दिनांकापूर्वी किंवा त्यानंतर दिलेला असो,- दिवाणी न्यायालयाच्या किंवा दिवाणी न्यायाधीशाच्या, जिल्हा न्यायालयाच्या किंवा जिल्हा न्यायाधीशाच्या कोणत्याही संदर्भाचा, धर्मादाय आयुक्ताचा संदर्भ म्हणून अन्वयार्थ लावण्यात येईल आणि तो, त्यानुसार, अधिकारितेचा, अधिकारांचा व प्राधिकाराचा वापर करील.".

सन १९५० चा अधिनियम क्रमांक २९ याच्या कलम ६६क ची सुधारणा.

**६.** मुख्य अधिनियमाच्या कलम ६६क मधील, " सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या साध्या कारावासाची शिक्षा किंवा पंचवीस हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल किंवा दोन्ही शिक्षा होतील" या मजकुराऐवजी, "एकतर, एक वर्षापर्यंत असू शकेल इतक्या कोणत्याही वर्णनाची कारावासाची शिक्षा किंवा पन्नास हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल, किंवा दोन्ही शिक्षा होतील" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९५०चा अधिनियम क्रमांक २९ याच्या कलम ६६ख ची सुधारणा.

**७.** मुख्य अधिनियमाच्या कलम ६६ख मधील, " तीन महिन्यांपर्यंत असू शकेल अशा साध्या कारावासाची शिक्षा किंवा वीस हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल किंवा दोन्ही शिक्षा होतील" या मजकुराऐवजी, "एक वर्षापर्यंत असू शकेल अशा साध्या कारावासाची शिक्षा होईल किंवा पन्नास हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल, किंवा दोन्ही शिक्षा होतील" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९५०चा अधिनियम क्रमांक २९ याच्या कलम ७०अ ची सुधारणा.

**८.** मुख्य अधिनियमाच्या कलम ७०अ मध्ये, पोट-कलम (१) मधील,-

(१) विद्यमान परंतुकापूर्वी, पुढील परंतुक समाविष्ट करण्यात येईल :-

" परंतु, या पोट-कलमाखालील अर्ज, निष्कर्ष नोंदवल्याच्या, किंवा यथास्थिति, आदेश पारित केल्याच्या दिनांकापासून एकशेवीस दिवसांच्या आत, धर्मादाय आयुक्ताकडे सादर करण्यात येईल :";

(२) विद्यमान परंतुकामधील, " परंतु" या मजकुराऐवजी, " परंतु असे की " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९५०चा अधिनियम क्रमांक २९ याच्या कलम ७५ ची सुधारणा.

**९.** मुख्य अधिनियमाच्या कलम ७५ मधील,-

(१) " अपिलासाठी" या मजकुरानंतर, "आणि कलम ७०अ खालील अर्जासाठी" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल ;

(२) "अशी अपिले" या मजकुरानंतर, "आणि अर्ज" हा मजकूर जादा दाखल करण्यात येईल.

सन १९५०चा अधिनियम क्रमांक २९ याच्या कलम ८२ ची सुधारणा.

**१०.** मुख्य अधिनियमाच्या कलम ८२ मधील, " इलाखा शहर दंडाधिकारी किंवा" हा मजकूर वगळण्यात येईल.

२०२५ चा महा. अध्या. ७

सन २०२५ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ७ याचे निरसन व व्यावृत्ती.

**११.** ( १ ) महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था ( सुधारणा ) अध्यादेश, २०२५, हा, याद्वारे, निरसित करण्यात येत आहे.

( २ ) अशा प्रकारे निरसन झाले असले तरी, उक्त अध्यादेशाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती किंवा कोणतीही कार्यवाही ( काढण्यात आलेली कोणतीही अधिसूचना किंवा दिलेला आदेश यांसह ) ही, या अधिनियमान्वये सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती, कार्यवाही किंवा, यथास्थिति, काढण्यात आलेली अधिसूचना किंवा दिलेला आदेश असल्याचे मानण्यात येईल.

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

महाराष्ट्र राज्यातील सार्वजनिक, धार्मिक व धर्मार्थ विश्वस्तव्यवस्थांचे नियमन करणे आणि त्यांच्या कारभारासाठी अधिक चांगली तरतूद करण्यासाठी, महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम (१९५० चा २९) अधिनियमित केला आहे.

**२.** असे निदर्शनास आले आहे की, अखंड किंवा कायम विश्वस्त आणि सावधि विश्वस्त यांची नियुक्ती व त्यांचा कार्यकाळ याबाबत विविध विश्वस्तव्यवस्था लेखांमध्ये स्पष्टता नसल्यामुळे धर्मादाय आयुक्तासमोर व न्यायालयासमोर बहुविध विवाद येतात. त्यामुळे, विश्वस्तव्यवस्थांच्या कामकाजावर, लाभार्थ्यांच्या व जनतेच्या कल्याणावर परिणाम होतो.

जेव्हा सावधि विश्वस्त व अखंड विश्वस्त यांच्या नियुक्तीबाबत विश्वस्त लेखात कोणतीही विशिष्ट तरतूद अंतर्भूत केलेली नसते तेव्हा, त्यांच्या नियुक्तीसाठी नवीन कलम ३०अ समाविष्ट करून, त्याद्वारे अधिनियमात तरतूद करणे इष्ट आहे असे वाटले. उक्त अधिनियमाच्या कलम २(१८) मध्ये अंतर्भूत असलेल्या "विश्वस्त" या संज्ञेच्या विद्यमान व्याख्येत, त्यांच्या नियुक्तीच्या कालावधीवर आधारित विश्वस्तांचे, म्हणजेच, सावधि विश्वस्तांचे व अखंड विश्वस्तांचे प्रकार विनिर्दिष्ट करण्याच्या प्रयोजनासाठी सुधारणा करण्याचे प्रस्तावित केले होते.

**३.** उक्त अधिनियमाचे कलम १८ हे, "सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थांच्या नोंदणी"शी संबंधित आहे. कलम १८ च्या पोट-कलम (६) मधील प्रस्तावित सुधारणेत अशी तरतूद केली होती की, विश्वस्तव्यवस्थेची नोंदणी करण्याच्या अर्जासोबत, विश्वस्तव्यवस्थांच्या स्थावर मालमत्तेवरील मालकीहक्क किंवा हितसंबंध दर्शविणाऱ्या दस्तऐवजाची प्रत जोडली पाहिजे. यामुळे, विश्वस्तव्यवस्थेची नोंदणी करताना, कोणत्याही मालमत्तेवर विश्वस्तव्यवस्था मालमत्ता म्हणून केल्या जाणाऱ्या कोणत्याही खोट्या दाव्यास प्रतिबंध होईल.

**४.** जेव्हा विश्वस्तव्यवस्था लेखात किंवा कोणत्याही योजनेत, दिलेल्या किंवा पारित केलेल्या कोणत्याही न्यायालयाच्या आदेशात अथवा हुकुमनाम्यात, दिवाणी न्यायालयाचा किंवा दिवाणी न्यायाधीशाचा अथवा जिल्हा न्यायालयाचा किंवा जिल्हा न्यायाधीशाचा संदर्भ दिलेला असेल, अशा प्रकरणांमध्ये, न्यायालयाच्या व धर्मादाय आयुक्ताच्या अधिकारितेचा प्रश्न सोडविण्यासाठी अशा प्रकरणी, धर्मादाय आयुक्तास, अधिकारिता, अधिकार व प्राधिकार यांचा वापर करणे शक्य व्हावे यासाठी अशा संदर्भाचा, धर्मादाय आयुक्ताचा संदर्भ म्हणून अन्वयार्थ लावण्यात येईल, अशी तरतूद करण्यासाठी उक्त अधिनियमामध्ये नवीन कलम ५०ब समाविष्ट करण्याचे प्रस्तावित केले होते.

**५.** धर्मादाय आयुक्ताची पूर्वमंजुरी न घेता विश्वस्तव्यवस्थेची स्थावर मालमत्ता दुसऱ्याच्या नावे केल्याबद्दल शिक्षा करण्याची तरतूद, उक्त अधिनियमाच्या कलम ६६क मध्ये केलेली आहे आणि निर्धन व दुर्बल घटकातील रुग्णांसाठी धर्मादाय रुग्णालयांमध्ये राखीव खाटांच्या बाबतीत कलम ४१अअ खालील निर्देशांचे अनुपालन करण्यात कसूर केल्याबद्दल शिक्षा करण्याची तरतूद, कलम ६६ख मध्ये केली आहे. वरील संदर्भित उल्लंघनाची विविध उदाहरणे शासनाच्या निदर्शनास आली आहेत. म्हणून, शिक्षेचा जरब बसावा या दृष्टीने, उक्त कलमात सुयोग्य सुधारणा करून, विद्यमान शिक्षांमध्ये वाढ करण्याचे प्रस्तावित केले होते.

**६.** उप किंवा सहायक धर्मादाय आयुक्त यांच्यासमोरील कार्यवाहीच्या बाबतीत धर्मादाय आयुक्ताच्या पुनरीक्षणकारी अधिकारांची तरतूद, कलम ७०अ मध्ये केली आहे. तथापि, उक्त कलम ७०अ अन्वये अर्ज दाखल करण्यासाठी कोणतीही कालमर्यादा विनिर्दिष्ट केलेली नाही. म्हणून, उक्त कलमाखालील अर्ज बराच कालावधी उलटल्यानंतर देखील दाखल केले जातात. म्हणून, असा अर्ज दाखल करण्यासाठी एकशेवीस दिवसांच्या मुदतीची तरतूद करण्याकरिता उक्त कलम ७०अ मध्ये सुधारणा करण्याचे प्रस्तावित केले होते.

**७.** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते आणि उपरोक्त प्रयोजनांसाठी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियमात आणखी सुधारणा करण्याकरिता, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल

त्यांची खात्री पटली होती, आणि म्हणून त्यांनी दिनांक १ सप्टेंबर २०२५ रोजी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था (सुधारणा) अध्यादेश, २०२५ (सन २०२५ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ७), हा प्रख्यापित केला होता.

**८.** उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रुपांतर करणे हा या विधेयकाचा हेतू आहे.

मुंबई,
दिनांक ११ नोव्हेंबर, २०२५.

**देवेंद्र फडणवीस,**
मुख्यमंत्री.

## वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे ज्ञापन

या विधेयकात वैधानिक अधिकार सोपविसंबंधीचा पुढील प्रस्ताव अंतभूत आहे :—

**खंड १(२) (ब)**.—या खंडान्वये, राज्य शासन **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियत करील अशा दिनांकास कलम ५ अंमलात आणण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

२. वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचा वर नमूद केलेला प्रस्ताव, सामान्य स्वरूपाचा आहे.

**सन २०२५ चे वि. स. विधेयक क्रमांक ९२ महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२५ याचे परिशिष्ट.**

**(महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, १९५० यातील उतारे.)**

**(सन १९५० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २९)**

**१.** ** ** **

**२.** विषय किंवा संदर्भ यात काही प्रतिकूल नसेल तर या अधिनियमात - व्याख्या.

(२) ते (१७) ** ** **

(१८) "विश्वस्त" याचा अर्थ, ज्या व्यक्तीकडे केवळ तिच्याकडेच किंवा इतर व्यक्तींच्या समवेत विश्वस्त मालमत्ता निहित असेल ती व्यक्ती, असा आहे आणि त्यात, व्यवस्थापकाचा समावेश होतो;

(१९) व (२०) ** ** **

२-अ. ** ** **

**३. ते १७.** ** ** **

**१८.** (१) हा अधिनियम जिला लागू केला आहे अशा सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेच्या विश्वस्ताने त्या सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेच्या नोंदणीसाठी अर्ज करणे हे त्यांचे कर्तव्य असेल. सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थांची नोंदणी.

(२) ज्या प्रदेशाच्या किंवा उप-प्रदेशाच्या हद्दीत, विश्वस्तव्यवस्थेचा कारभार चालविण्यासाठी विश्वस्ताचे कार्यालय असेल किंवा यथास्थिति, विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता किंवा विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेचा मोठा भाग असेल त्या प्रदेशाच्या किंवा उप- प्रदेशाच्या धर्मादाय उप-आयुक्ताकडे किंवा सहायक धर्मादाय आयुक्ताकडे असा अर्ज करण्यात येईल.

(३) असा अर्ज लेखी स्वरुपात असेल व तो विहित करण्यात येईल अशा नमुन्याप्रमाणे असेल व त्याच्याबरोबर विहित करण्यात येईल अशी फी असेल.

(४) असा अर्ज-

(क) जी सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था हा अधिनियम तिला लागू करण्यात येण्यापूर्वी निर्माण करण्यात आली असेल त्या सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेच्या बाबतीत, हा अधिनियम लागू झाल्याच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या आत करण्यात येईल, आणि

(ख) जी सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था हा अधिनियम अंमलात आल्यानंतर निर्माण करण्यात आली असेल त्या सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेच्या बाबतीत, ती निर्माण झाल्याच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या आत करण्यात येईल.

(५) अशा अर्जात, इतर गोष्टींबरोबर, पुढील तपशील अंतर्भूत असेल-

(क-एक ) सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था ज्या नावाने ओळखण्यात येते किंवा येईल ते नाव (यात यापुढे सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेचे नाव असा निर्देश केला आहे)

(एक) विश्वस्त व व्यवस्थापक यांची नावे व पत्ते ;

(दोन) विश्वस्ताच्या पदावर उत्तराधिकाराने येण्याची पद्धत ः

(तीन) विश्वस्तव्यवस्थेच्या स्थावर व जंगम मालमत्तेची यादी व ती ओळखण्यास पुरेसे होईल असे तिचे वर्णन व तपशील ः

(चार) स्थावर व जंगम मालमत्तेची अंदाचे किंमत :

(पाच) अर्जाच्या दिनांकाच्या निकटपूर्वीच्या तीन वर्षांतील किंवा विश्वस्तव्यवस्था निर्माण होऊन जो कालावधी लोटला असेल त्या कालावधीतील या दोहोंपैकी जी कमी असेल त्या मुदतीतील, उत्पन्नावरून अंदाज केलेले विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेचे स्थूल सरासरी वार्षिक उत्पन्न :

(सहा) अशा सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेच्या संबंधात, खंड (पाच) अन्वये दिलेला तपशील ज्या मुदतीसंबंधी असेल त्या मुदतीत झालेल्या खर्चावरून अंदाज केलेल्या सरासरी वार्षिक खर्चाची रक्कम :

(सात) सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेसंबंधी विश्वस्ताकडे किंवा व्यवस्थापकाकडे ज्या पत्त्यावर पत्रव्यवहार करावयाचा तो पत्ता :

(आठ) विहित करण्यात येईल असा इतर तपशील

परंतु, कोणत्याही किंवा सर्व सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थांच्या बाबतीत, नियमात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा किंमतीच्या व अशा प्रकारच्या विश्वस्तव्यवस्थांच्या मालमत्तेचा तपशील देणे आवश्यक असणार नाही, अशी तरतूद नियमात करता येईल.

(६) पोट-कलम (१) अन्वये केलेल्या प्रत्येक अर्जावर, विश्वस्त किंवा त्याने या बाबतीत विशेष रीतीने प्राधिकृत केलेला त्याचा अभिकर्ता विहित करण्यात येईल अशा रीतीने, सही करील व ती सत्यापित करील. विश्वस्तव्यवस्था लेख केलेला असेल व तो अस्तित्वात असेल तर, त्याची एक प्रत अर्जासोबत जोडण्यात येईल.

६.क. ** ** **

(७) ** ** **

**१९ ते ३५.** ** ** **

सार्वजनिक विश्वस्थ व्यवस्थेच्या स्थावर मालमत्तेचे अन्यसंक्रामण.

**३६.** (१) विश्वस्तव्यवस्था लेखात काही अंतर्भूत असले तरी, धर्मादाय आयुक्ताच्या पूर्वमंजुरीशिवाय पुढील गोष्टी करणे विधिग्राह्य असणार नाही-

(क) सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेच्या मालकीच्या कोणत्याही स्थावर मालमत्तेची विक्री, अदलाबदल करणे किंवा ती देणगी म्हणून देणे, आणि

(ख) सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेच्या मालकीच्या शेतजमिनीच्या बाबतीत, अशा जमिनी दहा वर्षांपेक्षा अधिक मुदतीसाठी पट्ट्याने देणे किंवा कृषीतर जमिनीच्या बाबतीत किंवा इमारतीच्या बाबतीत अशी जमीन किंवा इमारत तीन वर्षांपेक्षा अधिक मुदतीसाठी पट्टयाने देणे. विश्वस्तव्यवस्थेचे हितसंबंध, तिला मिळणारे लाभ किंवा तिचे संरक्षण या गोष्टी लक्षात घेऊन, धर्मादाय आयुक्तास जी शर्त लादणे योग्य वाटेल अशा शर्तीस अधीन राहून, मंजुरी देता येईल;

(ग) कोणत्याही सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेच्या हिताच्या दृष्टीने, तिच्या कोणत्याही स्थावर मालमत्तेचा विनियोग करण्यात आला पाहिजे याबद्दल धर्मादाय आयुक्ताची खात्री झाल्यास, अर्ज करण्यात आल्यावर, विश्वस्तव्यवस्थेचे हितसंबंध किंवा तिला मिळणारे लाभ किंवा तिचे संरक्षण या गोष्टी लक्षात घेऊन, त्यास ज्या शर्ती लादणे योग्य वाटेल अशा शर्तीच्या अधीन राहून, अशा मालमत्तेचा विनियोग करण्यासाठी कोणत्याही विश्वस्तास प्राधिकृत करता येईल.

परंतु, धर्मादाय आयुक्तास, ज्या व्यवहारास खंड (क), (ख) किंवा (ग) अन्वये पूर्वमंजुरी दिलेली

असेल असे व्यवहार पूर्ण करण्यापूर्वी, त्याखाली लादण्यात आलेल्या शर्तींमध्ये, त्यास योग्य वाटतील असे फेरबदल करता येतील :

परंतु आणखी असे की, अशी शर्त ही कोणत्याही कंत्राट किंवा अभिहस्तांतरण अंमलात आणण्याच्या कालमर्यादेच्या बाबतीतील असेल तर तेव्हा, अशा शर्तीमध्ये फेरबदल करण्याचा अर्ज हा असा विनिर्दिष्ट कालावधी संपण्यापूर्वी करण्यात येईल.

(१क) धर्मादाय आयुक्त या अधिनियमाअन्वये तीस वर्षांपेक्षा अधिक कालावधीचा कोणताही भाडेपट्टा मंजूर करणार नाही.

(२) धर्मादाय आयुक्तास, पोट-कलम (१) चा खंड (क) किंवा खंड (ख) अन्वये दिलेली मंजुरी, अशी मंजुरी, आपल्याशी लबाडी करून, किंवा आपली गैरसमजूत करून देऊन किंवा मंजुरी मिळण्यासाठी महत्त्वाची असेल अशी वस्तुस्थिती आपल्यापासून लपवून मिळविण्यात आल्याच्या कारणांवरून, रद्द करता येईल ; आणि मंजुरी रद्द केल्याच्या दिनांकापासून एकशेऐंशी दिवसांच्या आत (किंवा धर्मादाय आयुक्त वेळोवेळी ठरवील अशा एकूण एक वर्षापेक्षा अधिक नसणाऱ्या आणखी मुदतीत.) मालमत्ता परत मिळविण्यासंबंधी निदेशात विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा उपाययोजना करण्याबद्दल विश्‍वस्तास निदेश देता येईल.

परंतु, अशी मंजुरी ती देण्यापूर्वी धर्मादाय आयुक्तांकडे लबाडी करून त्याद्वारे मिळविण्यात आली होती या कारणाखेरीज इतर कारणावरून अभिहस्तांतरण निष्पादित झाल्यानंतर या कलमाखाली अशी कोणतीही मंजुरी ही, मागे घेता येणार नाही.

(३) ज्या व्यक्तीच्या नावे मंजुरी देण्यात आली असेल त्या व्यक्तीस, मंजुरी का रद्द करण्यात येऊ नये याबद्दलचे कारण दर्शविण्याची वाजवी संधी दिल्याशिवाय, या कलमान्वये कोणतीही मंजुरी रद्द करण्यात येणार नाही.

(४) धर्मादाय आयुक्ताच्या मते, पोट-कलम (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मुदतीत, विश्‍वस्ताने परिणामकारक उपाययोजना करण्यात कसूर केली असेल किंवा वाजवी प्रयत्नांनी किंवा खर्चाने मालमत्ता परत मिळविणे शक्य नसेल तर, त्यास, विश्‍वस्ताला होणाऱ्या लाभाचे निर्धारण करता येईल व त्याने विश्‍वस्त निधीमध्ये अशा प्रकारे निर्धारण केलेल्या लाभाइतकी भरपाई करावी असा निदेश त्यास देता येईल.

(५) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, पोट-कलम (१) अन्वये जेथे पूर्व मंजुरी न मिळाल्यामुळे विश्‍वस्तव्यवस्थेस, व्यक्तींच्या मोठ्या निकायास किंवा प्रामाणिक खरेदीदारास त्रास होत असेल, अशा अपवादात्मक किंवा असाधारण परिस्थितीमध्ये, धर्मादाय आयुक्तास, जर पुढील नमूद परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्याची खात्री पटल्यास, विश्‍वस्तांकडून होणाऱ्या विश्‍वस्थव्यवस्थेच्या मालमत्तेच्या हस्तांतरणास कार्योत्तर मंजुरी देता येईल :-

(अ) अशा हस्तांतरणासाठी समर्थन करणारी आकस्मिक परिस्थिती निर्माण झाली होती.

(ब) उक्त हस्तांतरण करणे अनिवार्य झाले होते,

(क) विश्‍वस्तव्यवस्थेच्या हितासाठी हस्तांतरण आवश्यक झाले होते,

(ड) अशाप्रकारे हस्तांतरित केलेली मालमत्ता ही तज्ज्ञांद्वारे प्रमाणित केलेल्या अधिभावी बाजारमूल्यापेक्षा कमी नव्हते इतक्या मोबदल्यावर ती मालमत्ता हस्तांतरित केली होती.

(इ) सर्वोच्च मूल्य मिळण्याकरिता विश्‍वस्तांकडून वाजवी प्रयत्न करण्यात आले होते.

(फ) संपूर्ण व्यवहाराच्या कालक्रमात विश्‍वस्तांची कार्यवाही ही प्रामाणिक होती. आणि त्यांनी उक्त व्यवहारातून आर्थिक किंवा अन्य स्वरूपाचे कोणतेही लाभ घेतलेले नाहीत : आणि

(ग) त्या त्या वेळी अंमलात असणाऱ्या कायद्यान्वये दस्तऐवजाची नोंदणी करणे आवश्यक असल्यास,

नोंदणीकृत संलेख निष्पादित करून हस्तांतरण केले होते.

**स्पष्टीकरण –** पोट-कलम (५) च्या प्रयोजनार्थ "धर्मदाय आयुक्त" याचा अर्थ केवळ कलम ३ अन्वये नेमलेला धर्मदाय आयुक्त, असा आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| **३६-अ. ते ३६-ब** | ** | ** | ** |
| **३७. ते ४१.** | ** | ** | ** |
| **४१-क** | ** | ** | ** |

मोफत किंवा सवलतीच्या दरांनी उपचार करावयाच्या गरीब रूग्णांकरिता विवक्षित खाटा राखून ठेवण्यासाठी रूग्णालये इ. ना निदेश देण्याचा धर्मादाय आयुक्ताचा व राज्य शासनाचा अधिकार.

**४१ कक.** (१) त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यात किंवा विश्वस्तव्यवस्थेच्या कोणत्याही लेखात किंवा कोणत्याही करारात किंवा कोणत्याही न्यायालयाच्या, न्यायाधिकरणाच्या धर्मादाय आयुक्तांच्या किंवा इतर सक्षम प्राधिकरणाच्या कोणत्याही न्यायनिर्णयात, हुकूमनाम्यात किंवा आदेशात काहीही अंतर्भूत असले तरी, ज्याचा वार्षिक खर्च पाच लाख रुपयांपेक्षा किंवा राज्य शासन, गरीब वर्गास अत्यावश्यक वैद्यकीय सुविधा मोफत किंवा सवलतीच्या दरांनी उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने राजपत्रातील अधिसूचनेद्वारे वेळोवेळी विनिर्दिष्ट करील अशा अन्य मर्यादेपेक्षा, अधिक असेल अशा, राज्य सहाय्यित कोणत्याही सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेच्या बाबतीत. धर्मादाय आयुक्ताने किंवा राज्य शासनाने, रुग्णालय (कोणतेही शुश्रूषालय, किंवा प्रसूतिगृह यासह), दवाखाना किंवा वैद्यकीय सहाय्यासाठी असणारे कोणतेही इतर केंद्र (यात यापुढे ज्याचा निर्देश" वैद्यकीय केंद्र" असा करण्यात आला आहे) चालवणाऱ्या अशा कोणत्याही विश्वस्तव्यवस्थेच्या विश्वस्तांस किंवा त्यांच्याशी संबंधित असलेल्या व्यक्तीस पुढीलपैकी सर्व किंवा कोणतेही निर्देश देणे विधिसंमत असेलः

(क) उपलब्ध जागा व सुविधा लक्षात घेऊन कोणत्याही व्यक्तीला धर्म, वंश, जात, स्त्री-पुरुषभेद, जन्मस्थळ, भाषा या किंवा यांपैकी कोणत्याही कारणास्तव भेदभाव न करता, वैद्यकीय केंद्रातील प्रवेश कोणत्याही व्यक्तीस खुला असेलः

परंतु, एखादे वैद्यकीय केंद्र केवळ महिलांसाठीच असेल त्याबाबतीत, अशा केंद्रात कोणत्याही पुरुषावर उपचार करण्याची सक्ती केली जाणार नाही :

(ख) ज्यांची यथास्थिति वैद्यकीयदृष्ट्या विनामूल्य तपासणी करण्यात येईल आणि ज्यांच्यावर उपचार (नेत्रांतर्गत (इंट्रा ऑक्युलर) शस्त्रक्रिया यांसह) करण्यात येतील व ज्यांना रुग्णालयात दाखल करून घेण्यात येईल अशा दाखल होऊ इच्छिणाऱ्या किंवा उपचार घेऊ इच्छिणाऱ्या निर्धन रुग्णांसाठी निदेशांमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा रीतीने वैद्यकीय केंद्राच्या प्रत्येक विभागात वैद्यकीय तपासणी आणि उपचार यासाठी अशा वैद्यकीय केंद्रांवर उपचार करण्यात यावयाच्या रुग्णांच्या एकूण संख्येच्या १० टक्के आणि वापरातील खाटांच्या एकूण संख्येच्या १० टक्के खाटा आरक्षित ठेवणे आणि राखून ठेवणे.

(ग) राज्य शासन आपल्याकडून चालविण्यात येणाऱ्या तत्सम वैद्यकीय केंद्रावर आकारलेले दर विचारात घेऊन वेळोवेळी सामान्य किंवा विशेष आदेशांद्वारे ठरवील असे दर ज्यांना आकारण्यात येतील आणि वैद्यकीय तपासणी करण्यासाठी आणि उपचार करून घेण्यासाठी (नेत्रांतर्गत (इंट्रा ऑक्युलर) शस्त्रक्रिया यांसह) रुग्णालयात प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या अशा समाजातील दुर्बल घटकांतील लोकांसाठी, निदेशांमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा रीतीने वैद्यकीय केंद्राच्या प्रत्येक विभागात वैद्यकीय तपासणी आणि उपचार यासाठी अशा वैद्यकीय केंद्रावर उपचार करण्यात यावयाच्या रुग्णांसाठीच्या खाटांच्या एकूण संख्येच्या १० टक्के खाटा आणि वापरातील खाटांच्या एकूण संख्येच्या १० टक्के खाटा आरक्षित ठेवणे व राखून ठेवणे.

(घ) निदेशांमध्ये किंवा तद्न्वये काढलेल्या कोणत्याही सामान्य किंवा विशेष आदेशांमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा इतर आनुषंगिक किंवा पूरक आवश्यक गोष्टींचे अनुपालन करणे :

परंतु, वर उल्लेखिलेला एखादा निदेश देताना, धर्मादाय आयुक्त, कोणत्याही वैद्यकीय केंद्रावर यापूर्वीच उपलब्ध असलेल्या सोयी विचारात घेईल आणि अशा सोयींची उपलब्धता विचारात घेऊन, जर एखादी सोय खंड (ख) आणि (ग) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या टक्केवारीशी सुसंगत असल्यास तिच्या अधीन राहून, योग्य ते निदेश देईल.

परंतु आणखी असे की, जेथे केंद्र किंवा राज्य शासन किंवा इतर कोणतीही संस्था, यांच्याकडून प्राप्त होणा-या सहाय्यातून व अनुदानातून, वैद्यकीय केंद्रात एखाद्या व्यक्तीवर नेत्रांतर्गत (इंट्रा ऑक्युलर) शस्त्रक्रिया करण्यात आली असेल त्याबाबतीत, अशी शस्त्रक्रिया करुन घेणा-या व्यक्तीची, खंड (ख) किंवा, यथास्थिति, खंड (ग) च्या प्रयोजनासाठी लाभार्थी म्हणून गणना करण्यात येणार नाही.

(२) (क) पोट-कलम १ अन्वये दिलेल्या निदेशांच्या अंमलबजावणीची खात्री करून घेण्यासाठी, राज्य शासनाने याबाबतीत यथोचितरित्या प्राधिकृत केलेल्या अधिका-याने किंवा धर्मादाय आयुक्ताने किंवा त्याने याबाबतीत यथोचितरित्या प्राधिकृत केलेल्या त्याच्या प्रतिनिधीमार्फत कोणत्याही वैद्यकीय केंद्राला भेटी देणे, त्याचे निरीक्षण करणे आणि त्यांच्याकडून नियतकालिक अथवा अन्य विवरणपत्रे मागविणे हे विधि-संमत असेल.

(ख) पोट-कलम (१) अन्वये दिलेल्या निदेशाचे पालन करणे आणि खंड (क) अन्वये अशा निदेशांच्या अंमलबजावणीची पडताळणी करण्यासाठी उक्त अधिकाऱ्यास किंवा धर्मादाय आयुक्तास किंवा त्यांच्या प्रतिनिधीस आवश्यक असलेल्या योग्य त्या, सर्व सोयी पुरविणे, उपलब्ध करून देणे आणि सहकार्य देणे आणि त्याखाली गरजांचे अनुपालन करणे हे अशा केंद्राच्या प्रत्येक विश्वस्ताचे किंवा अशा वैद्यकीय केंद्राशी सबंधित असलेल्या प्रत्येक व्यक्तीचे कर्तव्य आहे.

(ग) पोट-कलम (१) अन्वये दिलेल्या एखाद्या निदेशाच्या संबंधात निर्वचन, अंमलबजावणी किंवा इतर कोणत्याही बाबीसंबंधी कोणताही वाद निर्माण झाल्यास ते प्रकरण योग्य निदेशांसाठी, धर्मादाय आयुक्तांमार्फत राज्य शासनाकडे पाठविण्यात येईल.

(३) ज्या शर्तीस अधीन राहून, अशा राज्य सहाय्यित विश्वस्तव्यवस्थेने पोट-कलम (४) च्या खंड (क) मध्ये निर्दिष्ट केलेले कोणतेही अनुदान, सूट किंवा सवलत, इत्यादीची तरतूद केली असेल किंवा तो तिला अन्यथा मिळाली असेल, अशा शर्तीच्या आधारे राज्य सहाय्यित विश्वस्तव्यवस्थेने ज्या सोयींची तरतूद केली आहे अशा कोणत्याही स्वरुपाच्या वैद्यकीय सोयींना प्रतिकूल होईल अशा त-हेने कलमे (१) व (२) मधील कोणत्याही गोष्टीमुळे बाधा येणार नाही आणि मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था (सुधारणा) अधिनियम, १९८४ च्या प्रारंभाच्या दिनांकास अंमलात असलेल्या वैद्यकीय सोयी जरी त्या आरक्षित केलेल्या आणि राखून ठेवलेल्या प्रकाराच्या टक्केवारीपेक्षा अधिक असल्या तरी त्या पूर्वीप्रमाणेच चालू राहतील.

(४) या कलमाच्या प्रयोजनार्थ, -

(क) " राज्य सहाय्यित सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था " म्हणजे, केवळ वैद्यकीय सहाय्यासाठी, असलेली किंवा वैद्यकीय सहाय्य व इतर धर्मादाय प्रयोजनासाठी असलेली आणि जी (कोणतेही शुश्रूषालय किंवा प्रसूतिगृह यांसह) एखादे रुग्णालय, दवाखाना किंवा अन्य एखादे वैद्यकीय उपचार केंद्र चालवीत असेल आणि जिला---

(एक) राज्य शासनाकडून किंवा केंद्र सरकारकडून किंवा कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाकडून नाममात्र किंवा सवलतीच्या दराने, एखादी जमीन किंवा इमारत, मालकीहक्काच्या तत्त्वावर किंवा भाडेपट्टयाने किंवा संमती-नि-परवाना तत्त्वावर मिळालेली आहे; किंवा

(दोन) राज्य शासनाकडून नागरी जमीन (कमाल मर्यादा व विनियमन) अधिनियम, १९७६, याच्या कलम २० किंवा २१ खाली कोणतीही रिकामी जमीन धारण करणे चालू ठेवण्यात सूट किंवा चालू ठेवण्याची परवानगी देण्यात आली आहे, किंवा

(तीन) जिला कोणत्याही सक्षम प्राधिकरणाने विश्वस्तव्यवस्थेच्या प्रयोजनार्थ, विकास नियंत्रण नियम यात भरपूर सवलत किंवा त्यातून सूट दिलेली आहे किंवा ते शिथिल केलेले आहेत; किंवा

(चार) जिला राज्य शासनाकडून, केंद्र सरकारकडून किंवा कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाकडून कोणतेही कर्ज किंवा हमी किंवा कोणतेही अनावर्ती सहायक अनुदान किंवा अन्य कोणतेही वित्तीय सहाय्य मिळालेले आहे अथवा कोणतेही आवर्ती सहायक अनुदान किंवा अन्य वित्तीय सहाय्य मिळत आहे;

अशी विश्वस्तव्यवस्था ;

(ख) " निर्धन व्यक्ती " म्हणजे, जिचे एकूण वार्षिक उत्पन्न तीन हजार सहाशे रुपयांहून किंवा राज्य शासन, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे वेळोवेळी, विनिर्दिष्ट करील अशा अन्य मर्यादाहून अधिक नसेल अशी व्यक्ती.

(ग) " समाजातील दुर्बल घटकातील व्यक्ती" म्हणजे, जी निर्धन नाही, परंतु, जिचे उत्पन्न दरसाल पंधरा हजार रुपयांहून किंवा राज्य शासन, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, वेळोवेळी, विनिर्दिष्ट करील अशा मर्यादेहून अधिक नसेल अशी व्यक्ती.

(घ) पोट-कलम (१) अन्वये आरक्षित केलेल्या किंवा राखून ठेवलेल्या टक्केवारीतील रुग्ण म्हणून रुग्णाला प्रवेश देण्यापूर्वी किंवा त्यांच्यावर उपचार करण्यापूर्वी, त्याप्रयोजनार्थ ठेवलेल्या नोंदवहीमधील विहित नमुन्यामध्ये, यथोचितरित्या पडताळणी केलेल्या आणि नोंद केलेल्या रुग्णाच्या प्रकाराची नोंद घेणे हे, प्रत्येक वैद्यकीय केंद्राच्या नियामक मंडळाचे ( मग त्यास कोणत्याही नावाने संबोधण्यात येत असो ) कर्तव्य असेल. जर रुग्णाच्या प्रकाराविषयी वाद निर्माण झाल्यास ते प्रकरण योग्य निदेशांसाठी धर्मादाय आयुक्ताकडून राज्य शासनाकडे पाठविण्यात येईल.

(५) या कलमाच्या पूर्वगामी तरतुदींमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, ज्या व्यक्तीला नसबंदी शस्त्रक्रिया करून घ्यावयाची आहे किंवा ज्या व्यक्तीला, राज्य शासनाने या बाबतीत विनिर्दिष्ट केलेली कोणतीही शस्त्रक्रिया किंवा वैद्यकीय उपचार करून घ्यावयाचे आहेत. अशा कोणत्याही व्यक्तीला कोणत्याही रुग्णालयात किंवा अन्य वैद्यकीय उपचार केद्रात, या कलमान्वये, आरक्षित केलेल्या किंवा वेगळ्या किंवा राखून ठेवलेल्या खाटांसंबंधात दाखल करून घेण्याचा हक्क असणार नाही आणि तिला तशी परवानगी असणार नाही.

**४१ ख. ते ४१ङ** ** ** **

**४२. ते ६६.** ** ** **

कलम ३६ च्या तरतुदींचे उल्लंघन करण्याबाबतची शास्ती.

**६६क.** जो कोणी, धर्मादाय आयुक्ताची पूर्वमंजुरी न घेता विश्वस्तव्यवस्थेची स्थावर मालमत्ता अन्य संक्रमित करील किंवा तसे करण्याचा प्रयत्न करील त्याला कलम ३६ च्या तरतुदीचे उल्लंघन केल्यावरून अपराधसिद्धीनंतर, सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या साध्या कारावासाची शिक्षा किंवा पंचवीस हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्य दंडाची शिक्षा होईल किंवा दोन्ही शिक्षा होतील.

कलम ४१ अअ च्या तरतुदींचे उल्लंघन करण्याबाबतची शास्ती.

**६६ख.** जो कोणी, कलम ४१कक अन्वये काढण्यात आलेल्या कोणत्याही निदेशांचे अनुपालन करण्यात, वाजवी कारणाशिवाय कसूर करील, त्याला अपराधा सिद्धीनंतर, तीन महिन्यांपर्यंत असू शकेल अशा साध्या कारावासाची शिक्षा किंवा वीस हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्य दंडाची शिक्षा होईल किंवा दोन्ही शिक्षा होतील.

**६६ग.** ** ** **

**६७. ते ६९.** ** ** **

**७०.** (१) धर्मादाय उप-आयुक्त किंवा सहाय्यक धर्मादाय आयुक्त याच्या निष्कर्षाविरुद्ध किया आदेशाविरुद्ध पुढील बाबतीत धर्मादाय आयुक्ताकडे अपील करता येईल — धर्मादाय उप-आयुक्त किंवा सहायक धर्मादाय आयुक्त यांच्या निष्कर्षाविरूद्ध अपिले.

(क) कलम २० खालील निष्कर्ष' व आदेश, तसा असल्यास,

(ख) कलम २२ खालील निष्कर्ष

(ख - १) कलम २२ - क खालील निष्कर्ष

(ग) कलम २८ खालील निष्कर्ष ;

(ग- १) कलम ४१ग खालील आदेश ;

(ग-२) कलम ५०क खालील आदेश ;

(घ) कलम ५४ पोट-कलम (३) खालील आदेश ;

(घ-१) कलम ७९ च्या पोट-कलम (१) खालील आदेश ;

(ङ) कलम ७९ कक अन्वये, अभिलेख कायम करणारा किंवा त्यात सुधारणा करणारा आदेश;

(२) निष्कर्षाची नोंद करण्यात आल्यापासून किंवा यथास्थिति, आदेश देण्यात आल्यापासून साठ दिवसांची मुदत संपल्यानतर, कोणतेही अपील चालविता येण्याजोगे राहणार नाही.

(३) धर्मादाय आयुक्तास, अपीलदाराचे किंवा त्याच्या वतीने हजर राहणाऱ्या कोणत्याही व्यक्तीचे म्हणणे ऐकून घेतल्यावर, लेखी नमूद करावयाच्या कारणावरुन ज्याविरुद्ध अपील करण्यात आले असेल असा निष्कर्ष किंवा आदेश विलोपित करता येईल, तो बदलता येईल, त्यात फेरफार करता येईल किंवा तो कायम करता येईल किंवा त्यास, धर्मादाय उप-आयुक्त किंवा सहायक धर्मादाय आयुक्त यास अधिक चौकशी करण्याविषयी किंवा त्यास आवश्यक वाटेल असा आणखी पुरावा घेण्याविषयी निदेश देता येईल किंवा त्यास स्वतःस असा आणखी पुरावा घेता येईल.

**७०-क** (१) धर्मादाय आयुक्तास कलम ७० मध्ये नमूद केलेल्या कोणत्याही प्रकरणात, एक तर स्वतः होवून किंवा अर्ज केल्यावर कोणत्याही धर्मादाय उप-आयुक्ताने किंवा सहायक धर्मादाय आयुक्ताने अभिलिखित केलेल्या किंवा काढलेल्या कोणत्याही निष्कर्षाच्या किंवा आदेशाच्या अचूकपणा विषयी स्वतःची खात्री करुन घेण्यासाठी, धर्मादाय उप-आयुक्तापुढील किंवा सहायक धर्मादाय आयुक्तापुढील अशा प्रकरणाचे अभिलेख व कामकाज मागविता येईल, ते तपासता येईल, आणि त्यास असा निष्कर्ष किंवा आदेश विलोपित-करता येईल, तो बदलता येईल, त्यात फेरफार करता येईल किंवा तो कायम करता येईल किंवा धर्मादाय उप-आयुक्त किंवा सहायक धर्मादाय आयुक्तास अधिक चौकशी करण्याविषयी किंवा त्यास आवश्यक वाटेल असा आणखी पुरावा घेण्याविषयी निदेश देता येईल किंवा त्यास स्वतः स असा आणखी पुरावा घेता येईल : — धर्मादाय आयुक्ताने धर्मादाय उप-आयुक्त किंवा सहायक धर्मादाय आयुक्तास यांच्याकडील अभिलेख व कामकाज मागविणे व ते तपासणे.

परंतु, ज्याच्यावर त्यामुळे परिणाम होणार असेल अशा पक्षास आपली बाजू मांडण्याची संधी दिल्यावाचून, धर्मादाय आयुक्ताने असे कोणतेही आदेश अभिलिखित करता कामा नयेत किंवा काढता कामा नयेत.

(२) पोट-कलम (१) मधील कोणत्याही मजकुरामुळे, धर्मादाय आयुक्तास पुढील बाबतीत कोणत्याही प्रकरणाचे अभिलेख मागविण्याचा आणि ते तपासण्याचा हक्क असणार नाही.

**७३ ते ७४.** ** ** **

**७५.** या प्रकरणान्वये अपिलासाठी दिलेली मुदत मोजताना, भारताचा मुदतीबाबत अधिनियम, १९०८ याची कलमे ४, ५, १२ व १४ यांच्या तरतुदी, अशी अपिले दाखल करण्याच्या बाबतीत लागू असतील. — मुदत.

**७६. ते ८१.** ** ** **

या अधिनियमाखालील अपराधांची न्यायचौकशी

**८२**. महानगर दंडाधिकारी किंवा प्रथम श्रेणी दंडाधिकारी याच्या दर्जापेक्षा कमी दर्जाच्या कोणत्याही न्यायालयाला या अधिनियमान्वये शिक्षापात्र असलेल्या कोणत्याही अपराधांची न्यायचौकशी करता येणार नाही.

**८३. ते ८८.** ** ** **

**अनुसूची.** ** ** **

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९२.]**

**[ महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियमात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.]**

**[श्री. देवेंद्र फडणवीस,**
मुख्यमंत्री.**]**

**(विधानसभेने दिनांक ९ डिसेंबर, २०२५ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

**जितेंद्र भोळे,**
सचिव - १,
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मुद्रणालय, नागपूर.